
मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | गुरुवार, दि. 13 मार्च 2025 | पान- 1

# शहरातील किती अनधिकृत शाळा बंद? शिक्षणमंत्र्यांनी दिली माहिती

## राज्यातील 388 खासगी शाळा अनधिकृत : शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांची कबुली



**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील ३८८ खासगी शाळा अनधिकृतरीत्या चालवल्या जात असल्याचे असल्याची कबुली शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधिमंडळात दिली. पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील २२ अनधिकृत शाळांपैकी ११ शाळा बंद करण्यात आल्या आहेत. तर उर्वरित सहा शाळांना मान्यता मिळाली असून, पाच शाळांना इरादापत्र प्राप्त झाल्याची माहितीही भुसे यांनी दिली.

विधिमंडळ अधिवेशनात राज्यातील अनधिकृत शाळांसंदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. या प्रश्नाला शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी उत्तर दिले. शिक्षण आयुक्तांच्या १८ जुलै २०२३ च्या पत्रानुसार राज्यात अनधिकृत ६६१ शाळा चालवल्या जात होत्या. गेल्या दोन वर्षांत शासनाद्वारे घेतलेल्या विशेष मोहिमेद्वारे ११७ शाळा बंद करण्यात आल्या. ठाणे जिल्ह्यात प्राथमिकच्या ६४, माध्यमिकच्या २४ अशा एकूण ८८ अनधिकृत शाळा चालवल्या जात आहेत. त्यापैकी ४१ शाळांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, अनधिकृत शाळा बंद करण्याची कार्यवाही शिक्षणाधिकाऱ्यांकडून सुरू आहे. लातूर जिल्ह्यातील अनधिकृत शाळेवर नियमानुसार दंड आकारण्यात आला आहे.

अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याचे निर्देश शासन स्तरावरून वेळोवेळी देण्यात आले आहेत. २०१० च्या शासन निर्णयातील तरतुदींचे पालन करत असलेल्या २०१३ पूर्वीच्या अनधिकृत शाळा, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा अधिनियम २०१२ मधील तरतुदींची पूर्तता करत असलेल्या शाळांबाबत तपासणी करून शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. २०१३ नंतरच्या अनधिकृतरीत्या सुरू असलेल्या शाळा अधिनियमांतील तरतुदीचे पालन करत असल्यास संबंधित शाळांच्या प्रस्तावावर तरतुदीनुसार कार्यवाही करण्याच्या, तसेच निकषांची पूर्तता करत नसलेल्या शाळा बंद करून विद्यार्थ्यांचे लगतच्या शाळेत समायोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही भुसे यांनी स्पष्ट केले.

---

# पीएमआरडीए प्रदर्शन केंद्राच्या जागेत उभा राहणार छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा

## चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांचा नागरी सत्कार सोहळा




**पिंपरी | प्रतिनिधी**

बोऱ्हाडेवाडी, मोशी येथील पीएमआरडीएच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राच्या (पीआयईसीसी) जागेत छत्रपती संभाजी महाराज यांचा 100 फूट उंच पुतळा उभारण्यात येणार आहे. पुतळ्याची जागा बदलण्यास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी महापालिकेच्या मंगळवारी (दि.11) झालेल्या विशेष बैठकीत सर्वसाधारण सभेची मंजुरी दिली.

बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह संबंधित विभागांचे विभाग प्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते. महापालिकेच्या वतीने बोऱ्हाडेवाडी येथे छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात येणार आहे. पुतळ्यासाठी चौथरा उभारण्याचे काम सुरू करण्यात आले. त्यानंतर ती जागा योग्य नसल्याने दर्शनी भागात पुतळा उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला.

तो पुतळा आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राच्या जागेत उभारला जाणार आहे. त्यासाठी पीएमआरडीएने महापालिकेस 2.5 एकर जागा 21 जुलै 2023 ला दिली आहे. त्यानुसार, त्या जागेत पुतळ्याचे कांस्य धातूचे सुटे भाग तेथे आणून ठेवण्यात आले आहेत.

### काम तीन टप्प्यात होणार

- एक - पुतळ्यासाठी आवश्यक चौथऱ्याचे काम करणे 12 कोटी 47 लाख
- दोन - संभाजी महाराजांचा 100 फूट उंचीचा पुतळा उभारणे 32 कोटी 84 लाख
- तीन - पुतळा चौथऱ्याचे उर्वरित काम करणे. परिसर सुशोभिकरण करणे 15 कोटी 11

पुतळा दिल्ली येथील कार्यशाळेत तयार करण्यात आला आहे.

महापुरूषांचे पुतळे उभारण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राच्या नव्या जागेत हा पुतळा उभारण्याचा क क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाच्या प्रस्तावाला आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सर्वसाधारण सभेची मान्यता दिली आहे. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता घेऊन पुतळा उभारणीचे काम केले जाणार आहे.

पुतळा उभारणीचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रदर्शन, संग्रहालय, सुशोभीकरण, उद्यान, प्रकाश व्यवस्था, ध्वजस्तंभ याचे काम केले जाणार आहे. त्यासाठी स्वतंत्र निविदा काढली जाणार आहे.

# बदल्यांमध्ये राजकीय शिफारस चालणार नाही

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची अधिकारी, कर्मचाऱ्यांना कडक सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

सेवाज्येष्ठतेनुसार व उपलब्ध जागांनुसार बदल्या करण्यात येणार असून यात पारदर्शकता असेल. माझ्याकडे येण्याची आवश्यकता नाही. तसेच कुणीही राजकीय पदाधिकाऱ्यांना भेटू नये किंवा त्यांचे शिफारसपत्र आणू नका, अशा कडक सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या आहे.



जिल्ह्यातील महसूल कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित महसूल कार्यशाळेत ते बोलत होते. या वेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, भूमी अभिलेख विभागाच्या राज्य संचालिका सरिता नरके, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकर, डॉ. कल्याण पांढरे, उपविभागीय अधिकारी स्नेहा किसवे आदी उपस्थित होते.

डुडी म्हणाले, कर्मचाऱ्यांनी कामात पारदर्शकता वाढवावी, सर्वांनी नागरिकांच्या भेटण्याची वेळ निश्चित करावी. त्यासाठी दर सोमवारी व शुक्रवारी सकाळी दहा ते दुपारी दीड या काळात कार्यालयातच राहून नागरिकांच्या समस्यांकडे लक्ष पुरवावे.

या काळात जिल्हाधिकारी कार्यालयातून कोणत्याही कर्मचाऱ्याला बैठकीसाठी बोलावले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. तालुकास्तरावरील समस्या तालुकास्तरावरच सुटाव्यात, यासाठी नागरिकांशी संवाद साधून त्यांचे समुपदेशन करावे, अशा सूचना डुडी यांनी दिल्या.

### ‘महसूल’ कार्यशाळेत अधिकारी, कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांचा इशारा

जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या अनेक योजनांत प्रलंबितता दिसून येत आहे. त्यासाठी नेहमीची कारणे देऊन चालणार नाही. पारदर्शकपणे काम केल्यास ही कामे जलद गतीने मार्गी लागतील. त्यासाठी कोणाचाही दबाव स्वीकारू नका. ब्लॅकमेल करणाऱ्यांना बळी पडू नका. तुम्हा पारदर्शक असल्यास काळजी करू नका, मात्र, प्रलंबितता ठेवून चालणार नाही, अशा शब्दांत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांना तंबी दिली.

जिल्ह्यातील महसूल कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी आयोजित महसूल कार्यशाळेत ते बोलत होते. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार आदी उपस्थित होते.

डुडी म्हणाले, यापुढील काळात सर्वच विभागाचा जिल्हास्तरावरून आढावा घेण्यात येईल. त्यात 200 ते 250 गुणांची साचा ठरवून जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट तलाठी, मंडलाधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार ठरविण्यात येईल. त्यांना पुरस्कृत केले जाईल. मात्र, जे काम करणार नाहीत, त्यांच्यावर कारवाई अटळ आहे.

### 250 तलाठी लवकरच होणार रुजू

» जिल्ह्यात नव्याने अडीचशे तलाठी रुजू झाले असून, पुढील काही दिवसांत 100 तलाठी रुजू होणार आहेत. अनेकांना कार्यालय नाही. त्यामुळे अशा ठिकाणच्या कार्यालयांसाठी भाड्याने जागा घेण्याचा प्रस्ताव येत्या दहा दिवसांत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे द्यावा. कर्मचाऱ्यांकडून चांगल्या पद्धतीचे काम अपेक्षित असताना त्यांना संगणक प्रिंटर या सुविधांसह कार्यालयही उपलब्ध करून दिले जाईल. यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या 2025-26 च्या आराखड्यात कार्यालयांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

### पंधरा दिवसांत अवैध क्रशर थांबवा; अन्यथा...

» जिल्ह्यातील अवैध क्रशर उद्योग आणि खाणकामामुळे महसूल विभागाची प्रतिमा मलिन होत आहे. हे तातडीने थांबवावे. हे अवैध क्रशर उद्योग येत्या पंधरा दिवसांत तसेच अवैध खाणकाम दोन महिन्यांत बंद करावेत. त्यांच्यावर कडक कारवाई करा, असे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी महसूल यंत्रणेला दिले; अन्यथा मला कारवाई करावी लागेल. गेल्या काही महिन्यांत अवैध उत्खननावरून जिल्ह्याच्या विविध भागांत कारवाई करण्यात आली आहे.

# वाकडच्या विकासासाठी आता "आमदार आपल्या दारी"

## चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांचा नागरी सत्कार सोहळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर एप्रिल महिन्यामध्ये वाकड परिसरात “आमदार आपल्या दारी” हा उपक्रम राबवून प्रलंबित असलेले सर्व प्रश्न मार्गी लावणार आहे. वाकड परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्नशील आहे असे चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.




वाकड रेसिडेंट्स डेव्हलपमेंट अँड वेलफेअर असोसिएशनतर्फे महिला दिनानिमित्त चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांच्या नागरी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आमदार शंकर जगताप म्हणाले, गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला वाकड दत्तमंदिर ४५ मीटर रस्त्याचे काम सुरू आहे. सध्याच्या ३ लेन मध्ये आणखी एक लेन वाढवण्यात येऊन १८ मीटरचे ३० मीटर कॅरेज वे सुरू करणार आहे . शॉनेस्ट टॉवर येथील रस्त्याचा अडथळा दूर करण्यासाठी प्रयत्न करून तो रस्ता कार्यन्वित करण्याबाबत आमदार जगताप यांनी आश्वासन दिले.

वाकड मधील २० लक्ष लिटर पाण्याची टाकीतुन वाकड शहरवासियांना पाणी पुरवठा लवकरच काही दिवसात सुरू होईल. हरित पिंपरी चिंचवड साठी वृक्षारोपण अभियान सर्वत्र राबवत असून त्याच अनुषंगाने दत्त मंदिर रोड वर वृक्षारोपण करण्यात येईल. तसेच “ब” दर्जा असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांना आमदार निधीतून रेन वॉटर हार्वेस्टिंग, घनकचरा व्यवस्थापन, सौर ऊर्जा प्रकल्प, ईव्ही चार्जिंग स्टेशन, रस्ते व पदपथ सुधारणा आणि व्यायाम तसेच हरित क्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्नशील आहे असा विश्वास सोसायटी धारकांना दिला.

कार्यक्रमासाठी यावेळी माजी नगरसेवक विनायक गायकवाड, आरतीताई चोंधे, विशाल कलाटे, पुणे जिल्हा नियोजन समिती माजी सदस्य भारती विनोदे, राम वाकडकर, मंडल अध्यक्ष प्रसाद कस्पटे, रामदास कस्पटे, श्रीनिवास कलाटे ,निमंत्रक सचिन लोंढे, तेजस्विनी सवाई उपस्थित होते.

# सल्लागार, वास्तुविशारद पॅनल रद्द; वाढत्या तक्रारींमुळे महापालिकेचा निर्णय

**पिंपरी महापालिकेतील विकासकामांकरिता सल्ला घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सल्लागार पॅनलबाबत तक्रारी वाढल्यामुळे पॅनल रद्द करण्यात आले आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेतील विकासकामांकरिता सल्ला घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सल्लागार पॅनलबाबत तक्रारी वाढल्यामुळे अस्तित्वात असलेले सल्लागार आणि वास्तुविशारद पॅनल रद्द करण्यात आले आहे. पॅनल आणि वास्तुविशारद नव्याने नियुक्त करण्यात येणार, असून त्यासाठी महापालिकेने अर्ज मागविले आहेत.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थापत्य विभागात वरिष्ठ, कनिष्ठ अभियंते कार्यरत आहेत. असे असतानाही पदपथाच्या कामापासून रस्ते, उद्यान, उड्डाणपूल, प्रेक्षागृहांसह विविध लहान-मोठ्या प्रकल्पांसाठी कोट्यवधी रुपये मोजून सल्लागार आणि वास्तुविशारदांची नियुक्ती केली जाते. काही ठिकाणी सल्लागारांच्या चुकीच्या सल्ल्यामुळे विकासकामे फसली आहेत. मात्र, त्यानंतरही सल्लागार नेमण्याचा सपाटा सुरूच आहे. सल्लागार आणि वास्तुविशारद पॅनलबाबत तक्रारी आल्याने ते रद्द करण्यात आले आहे. आता नवीन पॅनल नियुक्त करण्यात येणार आहे. त्यानंतरही सल्लागार नेमण्याचा सपाटा सुरूच आहे. सल्लागार आणि वास्तुविशारद पॅनलबाबत तक्रारी आल्याने ते रद्द करण्यात आले आहे. आता नवीन पॅनल नियुक्त करण्यात येणार आहे.

नवीन पॅनलसाठी पाच कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या कामासाठी सल्लागार आणि दोन कोटींच्या कामासाठी वास्तुविशारद नेमण्यात येणार आहेत. त्यासाठी अर्ज मागविले आहेत. इमारत बांधकाम, रस्ते, पूल, भुयारी मार्ग, पाणीपुरवठा व जलःनिसारण, उद्यान, विद्युत, पर्यावरण अभियांत्रिकी, गृहनिर्माण व झोपडपट्टी निर्मूलन प्रकल्पांसाठी सल्लागारांच्या तीन श्रेणी आहेत. यामध्ये पाच ते २० कोटी, २१ ते ५० कोटी आणि ५० कोटींपुढील कामे अशा पद्धतीने श्रेणी आहेत. वास्तुविशारदांमध्ये चार श्रेणी आहेत. यामध्ये इमारत व आंतरिक रचना, उद्यान व 'लॅण्डस्केपिंग', शहरी रस्त्यांची रचना अशा प्रकारच्या कामासाठी दोन ते पाच कोटी, पाच ते २० कोटी, २१ कोटी, ५० कोटी आणि ५० कोटींच्या पुढील कामे अशा पद्धतीने वर्गवारी करण्यात आली आहे.

महापालिकेतील विकासकामांकरिता सल्ला घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सल्लागार पॅनलबाबत तक्रारी वाढल्यामुळे अस्तित्वात असलेले सल्लागार आणि वास्तुविशारद पॅनल रद्द करण्यात आले आहे. पॅनल आणि वास्तुविशारद नव्याने नियुक्त करण्यात येणार, असून त्यासाठी महापालिकेने अर्ज मागविले आहेत.

सल्लागार, वास्तुविशारद पॅनलमध्ये शंभरहून अधिक सदस्य आहेत. त्यांपैकी काही सल्लागारांच्या तक्रारी होत्या. प्रकल्प सल्लागार, वास्तुविशारद पॅनलची मुदतही संपली होती. त्यामुळे नव्याने पॅनल तयार करण्यात येत आहे. पॅनल तयार करण्यासाठी काही बदल करून अर्ज मागविण्यात आले असल्याचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले.

### सल्लागार, वास्तुविशारदांसाठी नियम, अटी

» प्रकल्प सल्लागार आणि वास्तुविशारद यांना कोणत्याही प्रकारच्या श्रेणीमध्ये अर्ज करता येणार आहे. प्रकल्प सल्लागार आणि वास्तुविशारद नेमणुकीसाठी शासकीय, निमशासकीय संस्थेचे मान्यताप्राप्त प्रमाणपत्र, पाच वर्षांचा प्रकल्प सल्लागार, वास्तुविशारद क्षेत्रातील कामाचा अनुभव प्रमाणपत्र, शासकीय कामे पूर्ण केल्याचे शासकीय, निमशासकीय अधिकाऱ्याने दिलेले अनुभव प्रमाणपत्र, संस्थेमध्ये काम करणाऱ्या सर्व जबाबदार कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे आवश्यक आहेत. प्रकल्प सल्लागार, वास्तुविशारद हा मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील पदवी, पदव्युत्तर पदवीधारक अभियंता असणे गरजेचे आहे.

# स्वतंत्र मनुष्यबळ असूनही कोंडी सुटेना; अरुंद रस्त्यामुळे वाहतूक कोंडीत भर

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील रस्ते प्रशस्त आहेत, शहरात उड्डाणपूल, ग्रेडसेपरेटर, भूयारी मार्ग असताना ही शहरातील 25 मुख्य चौकात वाहतूक कोंडी दररोज होत आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील रस्ते प्रशस्त आहेत. शहरात उड्डाणपूल, ग्रेडसेपरेटर, भूयारी मार्ग असताना ही शहरातील २५ मुख्य चौकात वाहतूक कोंडी दररोज होत आहे. त्याशिवाय शहराच्या पदपथ, सायकल ट्रॅकवरदेखील वाहनांचे पार्किंग होत असल्याने अनेक ठिकाणी रस्ते अरुंद होत असून त्या भागात देखील वाहतूक कोंडी होऊ लागली आहे. पालिकेच्या दळणवळण विभागाच्या अधिकाऱ्यांना नियुक्त्या दिया गेल्या आहेत, मात्र अद्याप कामाचे स्वरूपच ठरवण्यात आलेले नसल्याने वाहतूक कोंडीचे आव्हान हे अधिकार कसे पेलणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



वाहतूक कोंडीवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी महापालिकेने शहरी दळण-वळण विभाग तयार करत १३ उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना पदोन्नती देत त्यांची नियुक्ती केली. पण, सदरील विभागाच्या कामकाजाचे धोरण अद्यापही निश्चित करण्यात आलेले नाही. पुढे काय काम करायचे आहे, हेच ठरलेले नाही. तरीही अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याचा प्रकार महापालिका सामान्य प्रशासनाकडून केला आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या आसपास आहे. तसेच शहरात वाहनाची संख्याही दुप्पट झाली आहे. शहरातील प्रशस्त रस्ते, उड्डाणपुल, भूयारी मार्ग, सिग्नल फ्री रस्त्यावरही वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसून येत आहे.

अनेकदा वर्दळीच्या वेळेत सकाळी व सायंकाळी मुख्य, तसेच अंतर्गत रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागत आहेत. 'अर्बन स्ट्रीट डिझाइन'ने पदपथ व सायकल ट्रॅक तयार केल्याने त्यात रस्ते अरुंद झाले आल्याने कोंडीत आणखी भर पडत आहे. अनेक शहरांतील स्थानिक स्वराज्य संस्थेत वाहतूक नियोजनासाठी स्वतंत्र विभाग कार्यान्वित आहेत. मात्र, महापालिकेत तसा विभाग नव्हता. शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी, तसेच अपघातांचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी महापालिकेचे तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांनी 'बीआरटीएस' विभागाचे नाव बदलून 'वाहतूक नियोजन' असा स्वतंत्र विभाग केला.

### विभाग बदलला पण प्रश्न कायम

» शहरातील प्रशस्त रस्ते आणि उड्डाणपूलावर वारंवार वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याने नागरिक, वाहनचालक त्रस्त आहेत. त्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महापालिकेने शहरी दळण-वळण विभाग नव्याने सुरू केला आहे. त्यासाठी १३ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती तयार केली आहे. शहराचे संपूर्ण वाहतूक नियोजन सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. मात्र, त्या विभागासाठी स्वतंत्र असे धोरण निश्चित न झाल्याने हा विभाग ठोस असे काम करीत नसल्याचे दिसून येत आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी या विभागाचे नाव बदलून आता 'शहरी दळणवळण विभाग' असे केले आहे. या विभागासाठी सहशहर अभियंता (एक पद), कार्यकारी अभियंता (दोन पदे), उपअभियंता (तीन पदे), कनिष्ठ अभियंता (आठ पदे) अशी एकूण १३ पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्या पदावर नेमणुकाही करण्यात आल्या आहेत.

> राज्यातील मोठ्या शहरांतील महापालिकांमध्ये शहरी दळणवळण स्वतंत्र विभाग आहेत. त्यानुसार महापालिकेने शहरी दळणवळण विभाग सुरू करून अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या आहेत. त्या विभागाची जबाबदारी निश्चित करण्याचे काम सुरू आहे. लवकरच ते धोरण जाहीर केले जाईल..
>
> - विठ्ठल जोशी, उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग

# मटण सर्टिफिकेट वाद : खंडोबा देवस्थानच्या विश्वस्ताचा विरोध

## मंत्री नितेश राणे यांनी नुकतीच घोषणा केली आहे की राज्यातील हिंदू खाटीक समाजातील मटण दुकानदारांना मल्हार सर्टिफिकेशन दिले जाणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्याचे मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी नुकतीच घोषणा केली आहे की राज्यातील हिंदू खाटीक समाजातील मटण दुकानदारांना मल्हार सर्टिफिकेशन दिले जाणार आहे. हलाल विरोधात मल्हार सर्टिफाइड झटका मटण विक्री करण्यात येणार असून या दुकानातूनच हिंदू समाजाने मल्हार मटन खरेदी करावे अशी योजना असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. मात्र नितेश राणे यांचा हा निर्णय वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे.

जेजुरीच्या खंडोबा देवस्थानचा कारभार पाहणाऱ्या विश्वस्त मंडळातील एक विश्वस्त डॉ. राजेंद्र बबनराव खेडेकर यांनी झटका मटण सर्टिफिकेटला मल्हार नाव देण्यास तीव्र विरोध केला असून त्यांनी तसे पत्र मंत्री नितेश राणे यांना पाठवले आहे. पत्रामध्ये त्यांनी आपण मटन विक्रेत्यांसाठी घेतलेला निर्णय अत्यंत सार्थ आहे, जेणेकरून आपण कोणाकडून मटन खरेदी करतोय हे आपल्याला समजेल तसेच गोमांस किंवा कुत्रे व इतर प्राण्यांच्या मांस विक्रीला आळा बसेल, मात्र आपण या मटणाला मल्हार सर्टिफिकेशन असे दिलेले नाव अत्यंत चुकीचे आहे. हे नाव आपण त्वरित बदलावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

जेजुरीचा खंडोबा हा भगवान शंकराचा अवतार मानला जातो. या देवालाच मल्हार, सदानंद, मार्तंड अशा विविध नावाने ओळखले जाते. खंडोबा हा मूळ शाकाहारी देव असून त्याला पुरणपोळीचा नैवेद्य करण्याची परंपरा आहे. मटन नैवेद्य चालत नाही. चंपाषष्ठीला वांग्याचे भरीत व भाकरी असा नैवेद्य दाखवला जातो. ही देवता पूर्ण शाकाहारी आहे. विशेष म्हणजे खंडोबा देवता ही मुक्या प्राण्यांवर नितांत प्रेम करणारी देवता असून देवाच्या बाजूला नेहमी घोडा, कुत्रे, बैल आदी प्राण्यांचा सहवास असतो, त्यामुळे आपण झटका मास सर्टिफिकेटला मल्हार नाव देण्याचा निर्णय रद्द करावा व दुसरे नाव ठेवावे अशी विनंती त्यांनी केली आहे.

हलाल विरोधात मल्हार सर्टिफाइड झटका मटण विक्री करण्यात येणार असून या दुकानातूनच हिंदू समाजाने मल्हार मटन खरेदी करावे अशी योजना असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. मात्र नितेश राणे यांचा हा निर्णय वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे.



### मल्हार मटन नावाला आमचा जाहीर पाठिंबा – विश्वस्त मंगेश घोणे

» मल्हार सर्टिफिकेशन या मुद्द्यावरून खंडोबा देवस्थानच्या विश्वस्तांमध्येच मतभेद झाले आहेत. हिंदू खाटीक समाजाचे असलेले विश्वस्त मंगेश घोणे यांनी मंत्री नितेश राणे यांच्या या योजनेला जाहीर पाठिंबा दिला असून हिंदू खाटीक, धनगर समाजाच्या हितासाठी ही अतिशय चांगली योजना आहे, आपण कुठलाही व्यवसाय सुरू करताना त्या व्यवसायाला देवाचे नाव देतो. मग हे नाव दिले म्हणून बिघडले कुठे, असा सवाल त्यांनी विचारला आहे. देवस्थानचे विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर यांनी त्यांची वैयक्तिक भूमिका मांडली आहे. श्री मार्तंड देवस्थान समितीचा याच्याशी संबंध नाही. याबाबत कोणतीही बैठक झालेली नाही ते त्यांचे वैयक्तिक मत असल्याचे त्यांनी सांगितले. मी स्वतः मंत्री नितेश राणेंना भेटून त्यांनी घेतलेल्या या निर्णयाबद्दल त्यांचा सत्कार करणार आहे.

### जेजुरीच्या खंडोबाला मटणाचा नैवेद्य नाही

» जेजुरीचा खंडोबा हे अठरापगड जातीचे दैवत असून खंडोबा गडावर पुरणपोळीचा गोड नैवेद्य दाखवला जातो. अनेक समाजामध्ये जेजुरीला येऊन कुलधर्म करताना जागरण गोंधळाच्या वेळी बकरे कापण्याची प्रथा आहे. मात्र हा मांसाहारी नैवेद्य खंडोबाची धाकटी बायको बाणाई देवी हिला नेऊन दाखविला जातो. बाणाई देवी धनगर समाजातील मानली जाते. या देवीचे मंदिर अर्ध्या वाटेवर आहे. येथून पुढे मटणाचा नैवेद्य खंडोबा मंदिरात गडावर कधीही नेला जात नाही. येथील ऐतिहासिक होळकरांच्या चिंच बागेमध्ये दररोज शेकडो यात्रेकरू उतरून मटणाचे जेवण करीत असतात, मात्र हे नैवेद्य बानुबाईलाच दाखवला जातो.

---

# राजगुरूनगरात अतिक्रमणे जमीनदोस्त, पुणे-नाशिक महामार्गाने घेतला मोकळा श्वास

## पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूने झालेली अतिक्रमणे हटविण्याची मोहीम जोरदारपणे सुरु आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूने झालेली अतिक्रमणे हटविण्याची मोहीम जोरदारपणे सुरू आहे. महामार्गालगत केलेली अतिक्रमणे हटवण्यात येत असल्याने अनेकांचे व्यवसाय बंद झाल्याने त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे तर दुसरीकडे ही कारवाई योग्य झाल्याने महामार्ग मोकळा झाला आहे.

शिरोली, चांडोली, राजगुरूनगर बाह्यवळण रस्ता, तुकाईवाडी पानमळा हद्दीत पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणांवर सोमवारी (दि. 11) अतिक्रमण विरोधी पथकाने धडक कारवाई केली. तगड्या पोलीस बंदोबस्तात झालेल्या कारवाईत रस्त्यालगत नव्याने उभारण्यात आलेली पत्रा शेड, होर्डिंग जमीनदोस्त करण्यात आली. अनेक व्यावसायिकांचे यामुळे नुकसान झाले. काहींनी तर कर्ज घेऊन नुकतीच शेड, होर्डिंग उभारली होती. या कारवाईने त्यांचे आर्थिक कंबरडे मोडल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

पुणे-नाशिक महामार्गावर राजगुरूनगर शहरात येणाऱ्या बाह्यवळण रस्त्यावरील तुकाईवाडी जवळ जवळपास 15 पत्रा शेड करण्यात आलेली हॉटेल, दुकाने यावर जेसीबी यंत्राच्या साहाय्याने कारवाई करण्यात आली. पत्र्याची शेड उखडून टाकण्यात आली. राजगुरूनगर कारवाई सुरू असताना वरच्या भांबुरवाडीचे सरपंच विजय थिगळे, तुकाईवाडीचे माजी सरपंच काकासाहेब कोरडे व ग्रामस्थ व्यावसायिकांचे अधिकचे नुकसान होऊ नये म्हणून साहित्य बाजुला करून देण्यासाठी वेळ घेतला. अतिक्रमणे हटविल्याने रस्त्यावरील हॉटेल, दुकानांचे साहित्य भर उन्हात रस्त्यावर पडून होते.



### आगाऊ सूचना दिली मात्र...

» तुकाई वाडी परिसरात अनेक पत्रा शेड, होर्डिंग उभारली होती. त्यांना आगाऊ सूचना देण्यात येऊन स्वतःहून अतिक्रमण काढण्याची संधी दिली होती. मात्र थेट कारवाई पर्यंत स्वतःहून ती हटविण्यात आली नसल्याने अतिक्रमण पथकाने जेसीबी लावून सपाट केली. मोशी टोल नाका किंवा चिंबळी येथे कारवाईची सुरुवात झाली. पुढे पुढे कारवाई करण्यात येत आहे. चार किलोमीटरवर कारवाई होत असताना आणि माहिती दिली असताना ज्यांनी प्रतिसाद दिला नाही, अशा अतिक्रमणधारकांचे कारवाईमध्ये नुकसान झाले. त्याला प्रशासन जबाबदार नाही. असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### कोट्यवधी रुपयांचे नुकसान

» हॉटेल्स, टपऱ्या चहाची दुकाने भाजीपाला आणि होल्डिंग होते. दुकानांमध्ये अनेक परराज्यातील नागरिकांनी गुंतवणूक करून भाड्याने घेतली होती ज्यांची जागा गेली होती त्यांनी हम रस्त्याच्या कडेला दुकाने हॉटेल्स थाटली ती परराज्यातील नागरिकांना भाड्याने दिली होती त्यात त्यांचा व्यवसाय सुरू होता; मात्र अचानक धडक कारवाई झाल्याने त्यांनी भरलेला माल रस्त्यावर आला. त्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले.